
# चाणक्यचित्रे

## डॉ. शशांक परुळेकर



# चाणक्यचित्रे

## डॉ. शशांक परुळेकर

ई साहित्य प्रतिष्ठान

© शशांक व्यं. परुळेकर

प्रथम आवृत्ती १८ ऑक्टोबर २०१७

मुखपृष्ठ व अक्षरजुळणीः डॉ.  शशांक परुळेकर

**लेखकाशी संपर्कः**

ई-मेलः communicate.svp@gmail.com

**सूचनाः**

सर्व हक्क लेखकास्वाधीन. भारतीय आणि आंतरदेशीय कॉपीराईट कायद्यान्वये संरक्षित. या पुस्तकाचा कोणताही भाग लेखकाच्या पूर्वपरवानगीशिवाय पुनर्मुद्रित, फोटोकॉपी, इलेक्ट्रॉनिक, नाट्य अथवा चित्रपट या प्रकारे वापरण्यास मनाई आहे.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान
www. esahity. com
esahity@gmail. com
प्रकाशन : सप्टेंबर २०१७


- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई - साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे .

ज्याच्या आशीर्वादाने येथवर पोहोचलो, त्या परमेश्वराला अर्पण

या पुस्तकातील सर्व व्यक्ती व प्रसंग काल्पनिक आहेत.

# मनोगत

मी लहानपणापासून चित्रं काढत होतो, माझी चित्रं माझ्या शाळेतील इतर मुलांच्या चित्रांपेक्ष अधिक चांगली असायची असं नाही. माझे बहुतेक प्रयत्न शाळेच्या चित्रकला या विषयासाठी विहित पुस्तकांतल्या चित्रांची जमेल तेवढी हुबेहूब नक्कल करण्यासाठी असत, कारण आमचं चित्रकलेचं शिक्षण त्याच दृष्टीने बेतलेलं होतं. स्वतंत्र विचार आणि कला असं काही असतं हेच आम्हाला कोणी सांगितलं नव्हतं. स्वतंत्र कलानिर्मिती करता येत नसली तरी पण मी गोष्टी सांगण्यात वाकबगार होतो. मी परिपक्व झाल्यावर या कलेला विनोदाची झालर आली. त्याचा पुढे व्यंगचित्रं काढायला नक्कीच उपयोग झाला. मी व्यंगचित्रकलेकडे वळलोही नसतो. पण नशीबाने माझ्या वाट्याला स्वार्थी आणि डोक्याने कमी असे काही बॉस आले. योग्य आणि अयोग्य काय हे त्यांना कळत किंवा वळत नसलं, तरीही स्वतःच्या इच्छेप्रमाणे हाताखालच्यांना राबवून घेणं मात्र त्यांना छान जमायचं. स्वतःच्या फायद्यासाठी अशा बॉसना मस्का लावून आपला कार्यभाग साधणारी मंडळीही ओघाने आलीच होती. परिणामी माझ्यासारख्या लोकांना त्रास व्हायला लागला आणि आपल्यावर अन्याय झाल्यासारखं वाटायला लागलं. जेव्हा ते असह्य झाले, तेव्हा मी व्यंगचित्रं काढण्याकडे आपोआप वळलो. त्या प्रेरणेचा जोर येवढा होता की माझ्या कलेमध्ये कल्पकता आपोआप आली. मला व्यंगचित्रांच्या प्रचंड शक्तीची जाणीव झाली. एक व्यंगचित्र इतकं काही सांगू शकायचं की ते आठशे शब्दांचा लेखातूनही तितक्या शक्ती आणि स्पष्टतेने व्यक्त होऊ शकत नसे. मी त्या काळात अनेक व्यंगचित्रं


काढली. हे पुस्तक त्या व्यंगचित्रांवर बेतलेलं आहे. ज्यांना रुग्णालयांतलं जीवन माहित आहे त्यांना ती नक्कीच भावतील. ज्यांना ते माहित नाही त्यांना ते कसं असतं ते हे पुस्तक वाचून कळेल. ज्या प्रकारच्या व्यक्तींवर ही व्यंगचित्रं बेतलेली आहेत त्यांना ती बघून अस्वस्थ वाटू शकेल किंवा रागही येईल. पण तो या पुस्तकाचा हेतू नाही. हे पुस्तक वाचून ही मंडळी सुधारतील अशी मला आशा आहे (कोण खिक असं हसलं ते?). वाचकांतील कोणीही योग्य तो धडा घेऊन अशा माणसांसारखं वागू नये येवढी तरी अपेक्षा मी ठेवू शकतो असं मला वाटतं. अगदी काहीच नाही तरी ते वाचून वाचकांचं मनोरंजन तरी होईल याची मला खात्री आहे.

शशांक परुळेकर


# लेखकाविषयी थोडंसं




डॉक्टर शशांक परुळेकर के.ई.एम्. हॉस्पिटल आणि सेठ जी.एस्.मेडिकल कॉलेजात स्त्री आणि प्रसूतीरोगविभागाचे प्राध्यापक आणि प्रमुख आहेत. दिवसभर रुग्णसेवा आणि सायंकाळी वाचन आणि लिखाण असा त्यांचा दिनक्रम असतो. वैद्यकीय विषयांवर त्यांची वीस पुस्तके प्रकाशित झाली आहेत. स्त्री आणि प्रसूतीरोगावरच्या इंटरनॅशनल जर्नलचे ते संस्थापक संपादक आहेत. वैद्यकीय शिक्षण घेतांना आलेले अनुभव त्यांनी 'डॉक्टरबाबू' आणि ‘डॉक्टर चाणक्य’ या पुस्तकांमध्ये हलक्याफुलक्या शैलीत मांडले होते. अशाच अनुभवांचं व्यंगचित्रण त्यांनी या पुस्तकात केलं आहे..




मी नेहमीच म्हणते की शिक्षण पुस्तकं वाचून होत नाही,
तर केवळ अनुभवातून होतं.




शिक्षणासाठी पुस्तकं वाचण्याची गरज नाही असं मॅडमनी सांगितल्यावर निवासी डॉक्टरांनी आपली सगळी पुस्तकं विकून टाकली आहेत. आता ते केवळ अनुभवातून शिकणार आहेत.




या झाडाचा पहिला नारळ त्यांना आय.व्ही.एफ. सेंटरच्या उद्घाटनासाठी वापरायचा आहे.




गव्हाणीतला कुत्रा.




ही आमचे आय.व्ही.एफ. शल्यक्रियागार आणि प्रयोगशाळा.





त्या बाईची प्रसूती अर्ध्या तासाने होईल, त्या दुसरीला फोर्सेप्स लावावा लागेल, अणि त्या तिसरीला दीड तासाने इमर्जन्सी सिझेरियन सेक्शन लागेल... मी नुसत्या एका नजरेने सांगू शकते.



इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर मला लेबर वॉर्डात जाऊन पेशंटांना तपासावं लागत नाही. मी इथे बसून सी.सी. टीव्हीवर त्यांच्याकडे बघून त्यांचे उपचार ठरवू शकते.




तुम्ही आत्ता त्यांना भेटू शकणार नाही. त्या मेडिकल कौन्सिलच्या मीटिंगची तयारी करताहेत.




सगळे उमेदवार एम.डी. होते. आणि आश्चर्य म्हणजे योनीमार्गातली पॉलिपची गाठ योनीमार्गातून शस्त्रक्रिया करून काढायची असं सगळेच म्हणाले.



.... आणि लक्षात ठेवा, मी अगदी निःपक्षपाती आहे, मी सगळ्यांशी अगदी सारखंच वागते.



मी २००१ साली सेवानिवृत्त झाले की ती माझ्या सिंहासनावर बसेल.



पहिली व्यक्ती: दयाबुद्धीची परिसीमा कोणती?

दुसरी व्यक्ती: तिची मोलकरीण काम सोडून गेल्यावर तिला दुसऱ्यांची मोलकरीण देणे.

पहिली व्यक्ती: अं हं! तिची मोलकरीण काम सोडून गेल्यावर तिला दुसऱ्यांची अर्जित रजा देणे.




घाबरू नकोस. आई आहे ना तुझ्या पाठीशी?.



माझी खात्री आहे की शिकवण्या घेण्यासाठी तो त्याचा नवा कॉम्प्यूटर वापरतोय. ते तो कसं करतो ते मला कळलं की मी ते बंद पाडते की नाही बघ..



हे टेबल साफ कर आणि उरलेलं खाणं गायनॅक ओटीतल्या डॉक्टरांना नेऊन दे.



ही पार्किंगची जागा मी तुझ्यासाठी आरक्षित केली आहे. अगं तुझ्याकडे गाडी नाही म्हणून काय झालं, तुझ्या नावावर जागा आहे याचा आनंद काय थोडा आहे?



उगी उगी. ओपीडीच्या दिवशी तुझ्या लेक्चररने दांडी मारली म्हणून रडू नकोस. तुला काम करावं लागणार नाही. मी विभागातल्या उरलेल्या पाच लेक्चररांना आणि सोबत चौदा निवासी डॉक्टरांना तुझं काम करायला पाठवते ना.




आपण शस्त्रक्रिया करणं थांबवून चालणार नाही, त्या जीवनदायी असतात. त्या थांबवल्या तर आपण मरून जाऊ.




मॅडमनी हा प्रतिष्ठेचा प्रश्न बनवलाय.





रुग्णालयात जंतूसंसर्ग होऊ नये म्हणून मी फार दक्ष असते. काही खाण्यापूर्वी मी नेहमी हात धुते.




या तळमजल्याच्या शस्त्रक्रियागारात वॉश अप व्हायला कंटाळा येतो. मला वाटतं आपण वरच्या मजल्यावर शल्यक्रियेसाठी वॉश अप होऊन खाली आलं पाहिजे.




माझ्या मुलीच्या परिक्षेच्या तयारीसाठी मला सुट्टी घ्यायचीय. तेव्हा माझं काम बघेन असं त्याने लिहून देईपर्यंत मला त्याच्याबरोबर सौजन्याने वागावं लागतंय. पोटच्या पोरांसाठी किती त्याग करावा लागतो नं?




माझ्या ... अं विभागाच्या विरुद्ध वागण्या-बोलण्याच्या आरोपात आरोपीला ज्यूरींनी दोषी ठरवलंय. ऑपरेशन थिएटरची धुलाई आरोपीच्या ऑपरेशनांच्या दिवशीच सलग पाच वर्षे ठेवावी अशी शिक्षा त्याला मी सुनावते.



काय करत असेल ते बाजूला ठेवून त्याला मॅडमनी तातडीने बोलावलंय. त्यांना त्याची खूप आठवण येतेय.





माझे विजय ... अं ... माझ्या ट्रॉफ्या.



तो इतका हुशार, कामसू आणि कर्तव्यदक्ष आहे ना, म्हणून मी सर्वोत्तम निवासी डॉक्टरच्या बक्षिसासाठी त्याच्या नावाची शिफारस केलीय.




त्या सगळ्यांनी नैमित्तिक रजेसाठी एकच कारण दिलंय .
'नवजात शिशूंच्या मृत्यूच्या चौकशीचा त्रास होतो'.



त्याच्याबरोबर कोण मुलगी आहे ते बघायला तू उठणार नसशील तर मी उठते.



दंड न करता ड्रायव्हिंग लायसन्स परत दिलं नाही तर माझ्या मुलाला एफसीपीएसच्या परिक्षेत नापास करणार म्हणता? पण एफसीपीएस म्हणजे काय?





मेला जळतो माझ्यावर. माझी खात्री आहे की मला दोन वर्षं जास्त मिळू नयेत म्हणून त्याच दुष्टाने काहीतरी करून सरकारला सेवानिवृत्तीचं वय साठ करू दिलं नसणार.



तुम्हा लोकांना महत्वाकांक्षाच नाही. माझ्या प्रकल्पाचं काम तुम्ही केलं नाही तर तुम्ही मोठे कसे होणार?




इथे लिहिलंय की प्रकल्पात काम न करण्याची सवलत कोणाला द्यायची आणि काम करण्याची सक्ती कोणावर करायची ते प्रक्लपाचे मुख्य ठरवतील.



बालभारती, इयत्ता दुसरी,धडा तिसराः मुंग्या

कामकरी मुंग्या सगळं काम करतात, राणी मुंगी प्रजन करते आणि सैनिक मुंग्या राणी मुंगीचं रक्षण करते.




मी तिच्याशी अबोला धरलाय. बदली परिक्षक होशील का असं मी तिला विचारणार नाही, निक्षून सांगते.



सर्वोत्कृष्ट कठपुतळीवाल्या.




स्त्री आणि प्रसूतीरोगविभागातल्या वार्षिक खेळांच्या स्पर्धा: विभागप्रमुकांचे कान भरण्याचा खेळ.




त्यांचं म्हणणं बरोबर आहे. त्यांनी घेतलेल्या सुट्टीचा शेवटचा दिवस त्यांच्या इमर्जन्सी ड्यूटीच्या नंतर आला त्याला त्या काय करणार?



मॅडम, जुलाब होतात अशा खोट्या निमित्तावरून तिला रजेवर जाऊ देऊ नका. अशी निमित्त सांगून रजा घेण्याची परवानगी फक्त काही निवडक जणांनाच आहे.



मॅडम, या निवासी डॉक्टरच्या शोध निबंधातलं हे सर्वोत्तम पान आहे. मला त्याच्यात फक्त ७८ चुका सापडल्या.





चला, पुढचा उमेदवार!




'पाय (π)' च्या अर्थाबद्दलचा विवाद.



मॅडम, या सत्रासाठी हा नियम बदलायला हवा. पुढच्या सत्रात आपण जुना नियम परत लागू करू. म्हणजे दोन्ही सत्रांत आपल्याला हवे तसे निवासी डॉक्टर आपल्या युनिटमध्ये घेता येतील.




आळशी कुठला. बँक लांब आहे हे माझे चेक बँकेत टाकायला न जाण्याचं कारण सांगतोस काय? याच्यासाठी म्युन्सिपाल्टी तुला पगार देते काय रे?






त्यांनी अमेरिकेतल्या मासिकात वाचलेलं डाएट करून त्यांची वजनं कमी झाली नाहीत, म्हणून त्या आता त्याच्याकडे सल्ला मागायला आल्या आहेत.




आपल्या नव्या डाएट्‌मुळे आपल्या सगळ्यांचं मिळून पाचशें ग्रॅम वजन कमी झालं हे काय थोडं झालं?





ड्यूटीवर असताना मध्येच जाऊन खरेदी करून आलं की वेळेचा सदुपयोग होतो की नाही?.



वाचवा. हे टोळीयुद्ध आहे.



मॅडम त्या म्हणतायत की त्या आजपासून संपूर्ण उन्हाळी रजा घेतायत, कारण काल सर ओरडल्यामुळे त्यांना ॲबॉर्शन, हाय ब्लड प्रेशर आणि रक्तक्षय झालाय, ते दुसरे सर काहीबाही बोलल्यामुळे अपुऱ्या दिवसांच्या प्रसववेदना सुरू झाल्याहेत आणि त्यांच्या गर्भाची वाढ खुंटलीय, आणि त्यांनी तुम्हाला 'ब्रूटस तू सुद्धा?' असं विचारायला सांगितलंय.



येणाऱ्या नवजात शिशू मृत्यूच्या चौकशीत मी सगळ्यांचा
बदला घेते बघा.





येणाऱ्या नवजात शिशू मृत्यूच्या चौकशीची तयारी करण्यामुळे तुझं डोकं का दुखायला लागलंय रे?



मॅडम आज त्यांच्या मुलाच्या वाढदिवसासाठी हॉल शोधायला गेल्यायत, म्हणून त्या नवजात शिशू मृत्यूंची चौकशी करायला यऊ शकत नाहीयेत. लेक्चरर चौकशी करतील, कारण नाहीतरी त्यांनाच सगळ्या केसेस माहित आहेत, मॅडमना एकही केस माहीत नाही असं त्या म्हणाल्या.





चला, सगळ्यांनी यथेच्छ ताव मारा. आजच्या पार्टीसाठी
मी स्वतः हा पदार्थ बनवून आणलाय.




मॅडम, त्या बाईचं मूल गुदमरलं असा निरोप आला त्याबद्दल आपल्या दोघांचा गैरसमज झाला. सिझेरियन केलं तेव्हा तिच्या गर्भाशयात मूल सापडलंच नाही. महिन्यापूर्वी तिच मूल गुदमरलं म्हणून तिचं सिझेरियन झालं असा तो फोन होता.



या नव्या सिंड्रोमला 'मृत गर्भाचे ह्रुदयाचे ठोके' असं नाव देणार आहोत. श्रेयनामावळीत तुझं नाव पण टाकते, कारण तुझ्या हाउसमनलाच ते ठोके ऐकू आले होते ना?



तुम्ही म्हणता ते खरंय. रुग्णालयात असतात तेव्हा त्या याच खोलीत असतात. पण जरा बदलासाठी म्हणून त्या आत्ताच थोडसं काम करायला बाहेर गेल्यायत.



आपल्या विभागप्रमुखांनी डीनना निक्षून सांगितलं की जर त्या या मॅडमवर मेहेरनजर करत असतील तर त्या अतिशय वक्तशीर, कामसू, प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आहेत म्हणून.



माझं काय चुकलं की त्यामुळे माझं आवडतं मूल नावडतं झालं आणि नावडतं मूल आवडतं झालं?




आपण कधी प्रेग्नंट झालं तर सहा महिन्यांची मॅटर्निटी लीव्ह उन्हाळी सुट्टीच्या सुरुवातीला संपेल आणि मग विभागप्रमुख अर्ध्याऐवजी संपूर्ण उन्हाळी सुट्टी आपल्याला देतील याचं त्या गणित करतायत.



मॅडम, ऐका ना. तुम्ही मला देता ते सगळे लेक्चरर अगदी बेकार निघतात. त्या सगळ्यांनाच युनिट बदलून हवं होतं.




माझ्या युनिटमध्ये आम्ही दोनच डॉक्टरणी आहोत आणि त्यांतली एकच ड्यूटीवर असते म्हणून आपलं युनिट बदला असं ती म्हणते म्हणजे काय? हे अतीच होतंय हां.



येवढे स्लायडींग दरवाजे लावल्यामुळे रुग्णालयांत कपडे वाळत घालायची सोय मात्र चांगली झाली हं.





माझी मुलगी तीन वर्षांची होती तेव्हा अशीच कोपऱ्यात रुसून बसायची.



रात्री जर रुग्णालयातून मला फोन आला, तर काहीही न बोलता रिसीव्हर टेबलावर ठेवून द्यायचा. सकाळी आपण तो जाग्यावर ठेवू.



रात्री रुग्णालयातून फोन आला तर रिसीव्हर टेबलावर काढून ठेवण्यासाठी मोलकरीण स्पेशल टेलिफोन भत्ता मागतेय.



आमच्या विभागातल्या डॉक्टरांचं व्याकरण आपल्या बबडूच्या व्याकरणापेक्षा खराब आहे. दर उन्हाळी आणि दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये “मला समस्या असते' असं न म्हणता ‘मी एक समस्या असते” असं सगळेजण म्हणतात.





मी कोणाला मदत करत नाही आणि माझ्या लेक्चररांना इतरांना मदत करू देत नाही, कारण मदत केली तर इतर जण कार्यक्षम होणार नाहीत. अनुभवातून शिकण्यासाठी कोणी माझी कामं केली तर मात्र मी त्यांना नाही म्हणत नाही.





जंतूसंसर्ग पसरू नये म्हणून आपले ॲनास्थेटिस्ट सतत हातमोजे वापरतात.





माझ्या इमर्जन्सीच्या दिवशी मी माझ्या निवासी डॉक्टरांना सुद्धा सल्ला मागण्यासाठी मला फोन करू देत नाही. मग तुझ्या निवासी डॉक्टरांची मला फोन करायची कशी बिशाद झाली?



तुला काय म्हणायचंय ते मला समजलं नाही. संपूर्ण उन्हाळी सुट्टी मिळवण्यासाठी या वेळी मी कोणतं हाड फ्रॅक्चर करून घेणार म्हणजे काय?.



तिने उन्हाळी सुट्टीचा पहिला भाग घ्याव म्हणतोस?
अरे, ती दुसऱ्या भागात काम करायला आलीच नाही तर?



ममा, तो वाईट माणूस तुझ्ह्या इच्छेप्रमाणे कर म्हटलं तर ऐकत नाहीये. माझी इच्छा म्हणजेच तुझी इच्छा ना ममा?



तिला संपूर्ण उन्हाळी सुट्टीची गरज आहे हे आता तरी तुम्हाला पटलं का? अरे, दोन्ही पायांच्या करंगळ्या फ्रॅक्चर झाल्यावर असं चालत ती कामावर कशी येऊ शकेल?



ताप, रक्तदाब, रक्तक्षय, जुलाब, अर्धशिशी, फ्रॅक्चर असे विविध प्रकारचे आजार इमर्जन्सीच्या दिवशी हुकुमी होण्याचं माझं गुपित त्यांना कसं कळलं असेल बरं?




तू माझी रजा मंजूर केली नाहीस तर मी डीनकडे जाईन. डीननी माझी रजा मंजूर केली नाही तर माझं एखादं हाड फ्रॅक्चर होईल आणि मी सुट्टी घेईन .... फ्रॅक्चरसाठी माझ्या शरीरात अजून खूप हाडं शिल्लक आहेत..




मूर्खा! माझ्या युनिटमध्ये इतके दिवस काम केलंस, आणि तरीही दुपारी अडीचनंतर मी रुग्णालयात अस्न असं तुला वाटलंच तरी कसं?



डीन रजेवर असताना मॅडम पाहिजे तेव्हा कामावर येऊ आणि घरी जाऊ शकल्या असत्या. आता मॅडमच रजेवर गेल्या आणि आपण पाहिजे तेव्हा कामावर येऊ आणि घरी जाऊ शकत नाही.




तू पुन्हा हजेरीपटात माझ्या नावावर फुल्ली मारलीस तर याद राख. मी राजीनामा देईन. माझ्याशिवाय मॅडमचा टाइमपास होणार नाही आणि मग त्या तुझ्यावर खसकतील.



मोठ्या मॅडम: घरातल्या कटकटीपासून दूर कामावर आलं की कस छान वाततं नाही?

छोट्या मॅडम: हो ना. आणि इथून अर्धा दिवस झाल्यावर घरी निघून गेलं की आणखीनच छान वाटतं नाही?



मॅडम, शनिवारी अर्धा दिवस असतो म्हणून आपण १२:३० वाजता घरी जातो. या शनिवारी बँक होलिडे आहे म्हणून आपण २ तास आधी म्हणजे १०:३० वाजता घरी जाऊ शकतो. जर आपण एक तास बँक कन्सेशन घेतलं आणि एक तास लेट मार्क केला, तर इथे न येताच आपण ८:३० ते नऊ असा अर्धा तास ओव्हरटाइम केला असं होईल आणि आपल्याला त्याचे पैसे पण मिळतील, नाही का?




मॅडम, दुसरा आणि चौथा शनिवार रजा म्हणजे मला फक्त पहिल्या आणि तिसऱ्या शनिवारीच ओपीडी असेल. पण त्या दिवशी इतर सर्व जण दुपारी घरी गेले तर मला एकटीला रुग्णालयांत कसं राहवेल?




मॅडम, जर आपण आपला नवा कॉम्प्यूटर रेल्वे रिझर्वेशन काउंटरला जोडून घेतला तर बरं होईल. मग मी ऐन वेळी माझा उन्हाळी सुट्टीचा अर्धा भाग बफलला, तर इतरांना आपापली रिझर्वेशनं बदलणं सोपं जाईल.



कामावर आलो की आम्ही आमचे दुपट्टे इथे टांगून ठेवतो
... तुम्ही तुमच्या देशांत तुमचे ओव्हरकोट टांगता तसंच.



आता मला वाटतंय की कॉम्प्यूटर, स्कॅनर आणि प्रिंटर ऐवजी आपण एक झेरॉक्स मशीनच विकत घ्यायला हवं होतं.




जरा बाहेर वाकून बघ आपल्या ऑपरेशन थिएटरचा चहा करणारा माणूस दिसतोय का ते.




गरिबावर दया करा, नवजात शिशू मृत्यूच्या चौकशीचे भरलेले फॉर्म्स ऑडिट करण्यासाठी द्या हो.





गर्भामध्ये व्यंग निर्मान होऊ नयेत म्हणून आमच्या युनिटच्या या डॉक्टर ग्रहणाच्या दिवशी रजा घेऊन घरीच राहिल्या.




आमच्या आठ पेशंट सिझेरिअन सेक्शनसाठी थांबल्या आहेत. पण तुम्ही तुमच्या पेशंटचं सिझेरिअन करायला घ्या. मला दुपारी दोन ते चारच्या दरम्यानचा मुहूर्त हवा आहे.




नाही, आत्ता ते त्यांच्या मुलांना शाळेत सोडायला गेलेत. बायकोला तिच्या दवाखान्यात सोडायला ते साडेअकरा वाजता जातात.






हे एका दगडाने तीन पक्षी मारणं झालं. दुसऱ्या डॉक्टरांच्या पेशंटचं ऑपरेशन करून तुम्ही त्यांना आपले ऋणी करता, ऑपरेशनच्या अनुभवातून स्वतः काही शिकता, आणि तुम्ही केलेल्या ऑपरेशनची गुंतागुंत त्यांना सोडवायला लावून त्यांचं शिक्षण करता.



नवीन आलेल्या विध्यार्थ्यांना लेक्चर देण्यासाठी म्हणून त्यांनी त्यांच्या लग्नाच्या वाढदिवसाची पार्टी आत्ताच रद्द केली.




ती बाई मेली हे वाईट झालं. मी ऑपरेशन केलं म्हणून मी तिला माझ्या युनिटमध्ये ट्रान्सफर करायला आत्तापण तयार आहे. पण ते रुग्णालयाच्या नियमांमध्ये बसत नाही ना!



मीराचा मोहन....




या मॅडम सगळ्यात कामसू आणि प्रामाणिक आहेत. शनिवारी इमर्जन्सी ड्यूटीवरच्या लेक्चररने त्यांचं सगळं काम केल्याशिवाय त्या घरी जात नाहीत.



पेशंटच्या पोटाचे टाके तुटल्यावर तू इतरांसारखी काही दिवस मलमपट्टी न करता लगेच नवे टाके मारलेस, त्याला आधार देणारा एक संदर्भ मला शेवटी एका स्त्रियांच्या मासिकात सापडला.



हातात आधारासाठी तिच्या दोन काठ्या नसल्या तर तिला बोलता येत नाही.




ड्यूटीचा कोणता पर्याय निवडला तर मला कमीत कमी काम करावं लागेल त्याचा शोध ते लवकरात लवकर लावतील तर बरं होईल. मला माझा निर्णय मॅडमना सोमवारपर्यंत सांगितला पाहिजे.




नाविन्यपूर्ण धोकादायक स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून सलग तिसऱ्या वर्षी त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे.




मॅडम, तुमच्या लक्षात येतंय का की जर आपण तुमच्या योजनेची अंमलबजावणी केली तर रुग्णालयात केवळ हजेरी लावण्यापेक्षा जास्त काम मला करावं लागेल?



ही 'ऑटोमॅनिप्युलेट' आज्ञा दिली की कॉम्प्यूटर आपोआप नवजात शिशूच्या मृत्यूचा फॉर्म अशा प्रकारे भरतो आणि सगळे घोटाळे असे काही झाकून टाकतो, की ती केस ऑडिटला येतच नाही.




माता आणि नवजात शिशूच्या मृत्यूंचे ऑडिट करणारी सर्वोत्कृष्ट टीम म्हणून आपली निवड होणार असं सगळी जणं म्हणताहेत.




.... आणि मग आपण लेक्चर्सच्या यादीतली ती शेवटची एकदम बेकार लेक्चर्स त्या वाईट माणसाला देऊ.



मॅडम, तुम्ही काही चिंता करू नका. ती शल्यक्रिया करताना हरवलेली सुई जर सापडली नाही तर मी रुग्णाच्या नातेवाईकांना नवी विकत आणायला सांगीन.



शल्यक्रिया करताना त्यांना नाकं झाकायला लागत नाहीत, कारण त्यांच्या नाकांत सूक्ष्मजंतू गाळणाऱ्या जाळ्या उपजतच आहेत.




मॅडम, आज ऑपरेशन थिएटरमध्ये करणाच्या यादीत कोनकोणत्या शल्यक्रिया ठेवल्या आहेत?




मास्टर जादूगार. कामावरून अदृश्य होणं ही त्याची सर्वोत्तम ट्रिक आहे.




आमची कार्यपद्धती एकदम प्रगत आहे. या खोलीत बसून आमचे वरिष्ठ डॉक्टर शल्यक्रियागृहात निवासी डॉक्टर करतात त्या कामावर नजर पण ठेवतात आणि त्यांना मदत पण करतात.




जर ते ३ वाजताच्या मिटिंगांना आळीपाळीने हजर राहू शकतात, तर मग आपण त्यांच्या लेक्चर्सना आळीपाळीने हजर का राहू शकत नाही?



खरं तर हे भूलरोगतज्ज्ञ माणसं म्हणून खूप चांगले आहेत. त्यांच्या मॅडम कामावर येताना त्यांना दिसल्या की ते लगेच आपल्या पेशंटांना शल्यक्रियेसाठी भूल द्यायची सुरुवात करतात.





हीच ती प्रसिद्ध भूलरोगतज्ज्ञांची जोडगोळी. त्या डावीकडच्या मॅडमना स्टेथोस्कोप न वापरता रुग्णाच्या हृदयातले आवाज ऐकू येतात, आणि त्या उजवीकडच्या मॅडमना सुक्ष्मदर्शक न वापरता रुग्णाच्या फुप्फुसातले सूक्ष्मजंतू दिसतात.



"०/६ प्रतीची मर्मर? मला माहित नाही सर."
"अख्ख्या जगात फक्त त्या भूलरोगतज्ज्ञ मॅडमना ऐकू येते ती ०/६ प्रतीची मर्मर."



काहीही कर, पण तुमचं शल्यक्रियागार बंद होऊ देऊ नकोस. भूल देताना येवढा आराम मिळणारं दुसरं कोणतंही शल्यक्रियागार आपल्या रुग्णालयांत नाहीये.





नैमित्तिक रजेचा तो अर्ज बघून त्या गोंधळल्या आहेत. 'भूल देण्यासाठी अतिशय धोक्याच्या स्थितीतला रुग्ण नियोजित शल्यक्रियांच्या यादीत असणे' हे कारण त्यांनी या पूर्वी पाहिलेलं नाही.




रुग्ण शल्यक्रियांसाठी भूल घेण्यास सक्षम आहेत असा शेरा मिळवण्याची नवी कार्यपद्धती - प्रमुख भूलतज्ज्ञापुढे रांग लावून अदबीने उभे राहणे.



जर रक्ताच्या दोन्ही नमुन्यांवर एकच नाव आणि एकच क्रमांक असेल, तर चांगला रिपोर्ट माझ्या रुग्णाला मिळाला पाहिजे. माझे बॉस त्याच्या बॉसचे वरिष्ठ आहेत.




मॅडम, कॉम्प्यूटरवर तो नवा वॉलपेपर टाकल्यापासून ते असे मंत्रमुग्ध झाल्यासारखे तिथे बघत उभे राहिले आहेत. आपणही काही काम करत नाहीत आणि आम्हालाही काही काम करू देत नाहीत.





प्रभारी विभागप्रमुख म्हणून तू मला लेक्चर देण्यासाठी बोलाव. आणि एज लक्षात ठेव, मला लेक्च देण्यापूर्वी एक आणि लेक्चर दिल्यावर एक शीतपेय लागतं.




प्रसूती कक्षातून प्रसूत्योत्तर कक्षात रुग्णांना नेणारी गाडी.




नाही, मी माझ्या सासरच्यांबद्दल बोलत नाहीये - माझं लग्न झालेलं नाहीये. माझे बॉस माझ्याबरोबर कसे वागतात त्याबद्दल मी बोलतेय.




ती मेडिकल वॉर्डात असलेल्या तिच्या नियोजित वराबरोबर मोबाइलवर बोलतेय. ड्यूटीवर असताना रुग्णालयाचा फोन वैयक्तिक कामासाठी वापरणं तिच्या तत्वांत बसत नाही.




ते काय आहे हे जर तुला समजत नाहीये, तर ते ओढून बघ ना काय होतं ते.




सर, त्या बाईची प्रसूती झाली. माझं बोट लागलं आणि तिच्या गर्भाशयाचं तोंड जादू झाल्यासारखं उघडलं बघा.




माझं ॲक्युप्रेशर एकदम उपयुक्त आहे मॅडम. ते माझ्या एमडीच्या परिक्षेच्या वेळी माझ्या परिक्षकावर अगदी बरोबर चाललं होतं, आणि आता तुम्ही माझी एफसीपीएसची परिक्षा घेणार तेव्हापण हमखास चालेल बघा.



माझ्या परिक्षेला बसण्याच्या पद्धतीला 'इंदूर पॅटर्न' म्हणायचं असं मॅडमनी आणि मी ठरवलंय. विद्यार्थी असताना त्या सुद्धा हीच पद्धत वापरत असत.





ह्या एक नवा भयगंड दिसतोय. आपण त्याला 'निवासी-डॉक्टर भयगंड' असं नाव देऊ शकू.




प्रसूती करण्यासाठी हे एक नव्या प्रकारचं टेबल आलंय. त्याला गर्भाला खाली ढकलायसाठी उपकरण जोडलेलं आहे.




प्रत्येक विभागाच्या एका नशीबवान डॉक्टरला रुग्णालयाच्या आवारात निवासी जागा देण्यात येते, म्हणजे इच्छा झाली की तो घरी जाऊन आराम करू शकतो.




तुमचं काम तातडीचं असलं तरीही ती आत्ता झोपलीय आणि मी तिला उठवणार नाही.



डॉक्टरांचा संप झाला म्हणून जर एक आठवडा लवकर कामावर  यायला सांगितलं तर राजीनामा दे अस मला माझ्या पतीपरमेश्वराने सांगितलंय.



निवासी डॉक्टरांचा संप झाला म्हणून मी कामावर ... हॅलो हॅलो हॅलो ....लाईन खराब दिसतेय, काही ऐकू येत नाहीये....



निवासी डॉक्टरांचा संप झाला तरी मी कामावर गेले नाही तरी मॅडम मला काही बोलणार नाहीत. दोन मुलं असणाऱ्या स्त्रियांबद्दल त्यांना खूप अनुकंपा वाटते.

## दिनक्रम

**≥ 9:35**



कामावर येण्याची वेळ

**9:40**



घरी नवरा बरा आहे याची खात्री करणे

**9:45 to 10:00**



कॉफीची वेळ १

**10:05**



वॉर्ड राउंड वगैरे

**10:30**



कॉफीची वेळ २
कँटीनला भेट

**11:00**




नवऱ्याचं आपल्यावर अजूनही प्रेम आहे याची खात्री करणे

**11:15**



अभ्यासपूर्ण बौद्धिक चर्चा

**11:30**



मस्का लावणे

**12:30**



दुपारचे जेवण

**1:15**



मुलं जेवली याची खात्री करणे

**≥ 2:30**



घराकडे प्रस्थान

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. नव्याने लेखन करणाऱ्यांना एक मोठा वाचकवर्ग सहजासहजी उपलब्ध व्हावा ही आमची इच्छा. जगातील चाळीस देशांतील सुमारे साडॆतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. वर्षाला चाळीस लाख डाऊनलोड्स जगभरातून होतात.

पण आम्ही अजिबात समाधानी नाही. जगभरातल्या १२ कोटी मराठी लोकांपैकी किमान सहा कोटी तरी वाचक व्हायला हवेत. एक मोठ्ठी चळवळ उभी रहायला हवी. चांगल्या लेखकांना कोटीभर वाचक मिळायला हवेत. हे अशक्य नाही. आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.
ई मेल पत्ते esahity@gmail. com या पत्त्यावर पाठवा बरं